# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/ आधार प्रमाणीकरण/२०२४/ ५५८१ दिनांक : २६.०४.२०२४

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करणेबाबत...**

संदर्भ : - १. मा. अल्पसंख्यांक विकास विभाग पत्र क्र. अविवि-२०२४/प्र.क्र.४९/का-६ दि. २३.०४.२०२४

२. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं - शिष्य/वि.आ.प्र./२०२४ दि. २६.०४.२०२४.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, उच्च शिक्षण पुणे विभागांतर्गत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांनी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेच्या विद्यार्थ्यांची आधारनोंदणी तातडीने करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

सोबत - संदर्भ क्र. १ व २ चे सहपत्र.

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -411001

web : www.dhepune.gov.in E-mail- schol.dhepune@gov.in

फोन नं -020/29707098/26126939 फॅक्स 020/26111153

क्र.उशिंस -शिष्य/वि.आ.प्र/2024 दिनांक-.

प्रति,

1.मा. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

2.सर्व विभागीय सहसंचालक ,
उच्च शिक्षण

**विषय -विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करणेबाबत.**

संदर्भ - अल्पसंख्याक विकास विभाग पत्र क्रमांक अविवि-2024/94/प्र.क्र.49/का-6, दिनांक 23.04.2024.

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रानूसार , उच्च व्यावसायिक व इयत्ता 12 वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेच्या विद्यार्थ्यांची आधारनोंदणी तातडीने करण्याबाबत आपल्या स्तरावरुन तात्काळ कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. (सोबत पत्र जोडले आहे.)

तरी या बाबत आपल्या अधिनस्त असलेल्या शासकीय, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित(टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना विद्यार्थ्यांची आधारनोंदणी तातडीने करण्याबाबत कळविण्यात यावे.

**( डॉ. प्रकाश बच्छाव )**
शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे -1

प्रत- अल्पसंख्याक विकास विभाग,हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,मंत्रालय,मुंबई-32 यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन

क्रमांक: अविवि-२०२४/९४/प्र.क्र.४९/का-६
अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २३ एप्रिल, २०२४.

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८३००३१
ईमेल-desk६.mdd-mh@gov.in

प्रति,

१) संचालक - तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालीका मार्ग, पत्र पेटी क्रमांक१९६७, मुंबई-४०० ००१.

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन सचालनालय, महाराष्ट्र राज्य, ४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालय इमारत, फोर्ट, मुंबई .००१ ४००-

३) संचालक, शिक्षण (उच्च शिक्षण) संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१.

४) संचालक, अल्पसंख्याक प्रौढ शिक्षण संचालनालय, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

विषय:-- विद्यार्थ्याचे आधार प्रमाणीकरण करणेबाबत.

संदर्भ:- शा.शि. व क्री.विभाग यांचे पत्र क्र. आधार-२०२४/प्र.क्र.४४/एसडी-१, दिनांक - २.४.२०२४

महोदय,

उपरोक्त विषयावरील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर पत्रान्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत मान्यता मिळालेल्या खाजगी शाळा व्यवस्थापनांनी विद्यार्थ्यांची संख्या वाढवून आवश्यकतेपेक्षा अधिक शिक्षक-शिक्षकेतर पदे मंजूर करून घेतली असल्याचे निदर्शनास आले असल्याचे नमूद करून विद्यार्थ्यांची नोंद करताना त्यांच्या " आधार" ची नोंद करणे आवश्यक असल्याचे तसेच विभागामार्फत विविध गटांसाठी शिष्यवृत्तीच्या योजना राबविल्या जातात. विद्यार्थी नोंदणी तसेच शिष्यवृत्तीच्या विविध योजना पारदर्शी पध्दतीने राबविण्यासाठी "आधार" ची नोंद करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या उक्त निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की, उच्च व्यावसायिक व इयत्ता १२वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी (१) संचालक (वैद्यकिय शिक्षण), वैद्यकिय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२) संचालक, (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. व (३) संचालक, शिक्षण (उच्च शिक्षण) संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-याचेकडून करण्यात येत आहे. सबब, सदर शिष्यवृत्ती योजना ही आपल्यामार्फत राबविण्यात येत असल्याने उच्च व्यावसायिक व इयत्ता १२वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेच्या विद्यार्थ्यांची आधारनोंदणी तातडीने करण्याबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

आपली

(मेघना गौरव शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: वरीलप्रमाणे.

प्रत, निवड नस्ती का-६



Scanned with OKEN Scanner

आ.क्र. ६८४५/कार्या-६ E-6845510

9/4/24.


महाराष्ट्र शासन

रनजीत सिंह देओल, भा. प्र. से.
प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा)


आधार-२०२४/प्र.क्र.४४/एसडी-१


**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. : ०२२-२२०२५२९२, ०२२-२२०४६२६१
E-mail : acs.schedu2@maharashtra.gov.in


दिनांक : 02/04/2024.

विषय:- विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करणेबाबत.

प्रिय श्रीमती, कुंदन मॅडम,

राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत पोषण आहार, विविध सवलती व वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. बालकांना तसेच समाजातील इतर वंचित घटकांना कल्याणकारी राज्याच्या विविध योजनांच्या मुख्य प्रवाहात राहता यावे व एकही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये, म्हणून पोषण आहार, विविध सवलती व वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पारदर्शी पद्धतीने पोहोचविण्यासाठी उपाययोजना करण्याकरीता लाभार्थ्यांचा डेटाबेस तयार करून सदर माहिती आधारशी संलग्नीकृत करण्याचा निर्णय वित्त विभागाचा दि. ०८.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

२. राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत मान्यता मिळालेल्या खाजगी शाळा व्यवस्थापनांनी विद्यार्थ्यांची संख्या वाढवून आवश्यकतेपेक्षा अधिक शिक्षक-शिक्षकेतर पदे मंजूर करून घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांची नोंद करताना त्यांच्या "आधार" ची नोंद करणे आवश्यक झाले आहे. तसेच विभागामार्फत विविध गटांसाठी शिष्यवृत्तीच्या योजना राबविल्या जातात. विद्यार्थी नोंदणी तसेच शिष्यवृत्तीच्या विविध योजना पारदर्शी पद्धतीने राबविण्यासाठी "आधार" ची नोंद करणे आवश्यक झाले आहे.

३. भारत सरकारने युडायस + प्रणाली सुरु केली असून त्यामध्ये पुर्व प्राथमिक ते इ. १२ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यात येते. आपल्या राज्यानेही यामध्ये सर्व विभागाची शाळा, विद्यार्थी आणि शिक्षक यांची माहिती भरलेली आहे. सदर माहितीचे विश्लेषन केले असता राज्यामध्ये एकूण २,१२,५७,८५४ विद्यार्थ्यांपैकी २,०७,४१,६६ विद्यार्थ्यांची आधार नोंदणी झालेली असून यापैकी १,९४,८४,६८१ ( ९१.६६ %) विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले आहे. त्यामध्ये आपल्या विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळामधील एकूण १९०४ विद्यार्थ्यांपैकी १५८५ विद्यार्थ्यांची आधार नोंदणी पुर्ण झालेली असून त्यापैकी ११९४ ( ७५.३३ %) विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले आहे. युडायस+ प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांची आधार प्रमाणीत माहिती यापुढे बंधनकारक असून त्याचा उपयोग विविध योजना व विद्यार्थी लाभांशी जोडण्यात येणार आहे. त्यामुळे आपल्या अधिनस्त सर्व शाळांना १०० टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करून घेण्याबाबत तसेच युडायस + प्रणालीवरील आपल्या अधिपत्याखालील शाळांची माहिती सदर प्रणालीवर भरण्याबाबतही आपल्या स्तरावरून

उप. स. कार्या-६ श्री. शिंदे ASO D-6 18/4

अधिपत्याखालील शाळांची माहिती सदर प्रणालीवर भरण्याबाबतही आपल्या स्तरावरून यथोचित निर्देश देण्यात यावेत. यासंदर्भात शासकीय/ खाजगी अनुदानीत/ खाजगी विनाअनुदानीत शाळांमधील आधार प्रमाणीकरण नोंदी पूर्ण झाल्याची टक्केवारी सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आली आहे.

(रनजीत सिंह देओल)

श्रीमती, आय.ए. कुंदन (भा.प्र.से)
प्रधान सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग,
महाराष्ट्र राज्य.

Scanned with OKEN Scanner

# Aadhar Validation Status 2-04-2024

| Mgt | Management | Sum of Total Enrollment | Sum of Transgender Enrollment | Sum of Aadhaar not provided | Sum of Pending Aadhaar validation | Sum of Failed Aadhaar validation | Sum of Passed Aadhaar validation | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1_Govt | | 52,26,874 | 8 | 1,79,056 | 9,304 | 2,14,676 | 48,23,837 | 92.29% |
| 1 | Dept. Of education | 7,912 | - | 287 | 4 | 1,031 | 6,590 | 83.29% |
| 10 | Social Welfare Depatment | 13,625 | - | 182 | 11 | 1,116 | 12,316 | 90.39% |
| 13 | Tribal Welfare Department | 2,04,421 | - | 1,175 | 248 | 7,537 | 1,95,461 | 95.62% |
| 16 | Zilla Parishad (ZP) | 40,63,094 | 6 | 1,10,506 | 6,652 | 1,56,541 | 37,89,395 | 93.26% |
| 17 | Municipal Corporations (MNC) | 7,39,753 | 1 | 60,726 | 2,024 | 39,376 | 6,37,626 | 86.19% |
| 18 | Nagarpalika/ Nagarparishad/ nagarpanchayat | 1,75,021 | 1 | 5,692 | 344 | 6,710 | 1,62,275 | 92.72% |
| 21 | Govt. Sanik Schools | 1,118 | - | - | - | 159 | 959 | 85.78% |
| 24 | Railway School | 2,920 | - | 70 | - | 485 | 2,365 | 80.99% |
| 29 | Katak Mandal | 10,195 | - | 362 | 21 | 672 | 9,140 | 89.65% |
| 30 | Other Central Govt. Schools | 8,239 | - | 56 | - | 1,017 | 7,166 | 86.98% |
| 36 | Eklavya Model Residential School | 576 | - | - | - | 32 | 544 | 94.44% |
| 2_Private Aided | | 97,69,202 | 8 | 1,11,444 | 6,094 | 4,25,314 | 92,26,344 | 94.44% |
| 4 | Private Aided | 86,65,443 | 6 | 85,872 | 5,178 | 3,65,304 | 82,09,084 | 94.73% |
| 11 | Social Welfare Private Aided | 68,989 | - | 2,859 | 151 | 6,689 | 59,290 | 85.94% |
| 14 | Tribal Welfare Private Aided | 2,25,751 | 1 | 5,605 | 202 | 11,417 | 2,08,526 | 92.37% |
| 25 | Private Partially Aided | 6,21,231 | - | 10,113 | 349 | 26,502 | 5,84,267 | 94.05% |
| 28 | Private Milatary Schools | 13,151 | - | 49 | 6 | 353 | 12,743 | 96.90% |
| 39 | Gram Panchyat (Aided) | 386 | - | - | - | 4 | 382 | 98.96% |
| 40 | VJNT Private Ustod Kamgar Aided | 1,024 | - | 6 | - | 35 | 983 | 96.00% |
| 42 | VJNT Private Aided | 1,68,277 | 1 | 6,717 | 208 | 14,484 | 1,46,868 | 87.28% |
| 48 | Apang Kalyan Private Aided | 4,950 | - | 223 | - | 526 | 4,201 | 84.87% |
| 3_Private Unaided | | 62,61,778 | 6 | 2,25,688 | 16,401 | 5,85,187 | 54,34,500 | 86.79% |
| 8 | Unrecognized | 38,595 | - | 7,758 | 1,378 | 8,608 | 20,851 | 54.03% |
| 12 | Social Welfare Private Unaided | 16,549 | - | 1,320 | 188 | 3,863 | 11,178 | 67.54% |
| 19 | Private Unaided | 8,10,969 | 1 | 30,526 | 2,502 | 67,184 | 7,10,757 | 87.64% |
| 27 | Self Finance School | 53,90,037 | 5 | 1,85,601 | 12,299 | 5,04,688 | 46,87,447 | 86.97% |
| 43 | VJNT Priate Un-Aided | 749 | - | 58 | - | 89 | 602 | 80.37% |
| 49 | Apang Kalyan Private Un-Aided | 989 | - | 39 | - | 141 | 809 | 81.80% |
| 50 | Apang Kalyan Private Permanent Un-Aided | 654 | - | 55 | 1 | 190 | 408 | 62.39% |
| 52 | Private Permanent Unaided | 1,332 | - | 12 | 1 | 65 | 1,254 | 94.14% |
| 97 | Madarsa Recognized (by Wakf board/Madarsa Board) | 1,359 | - | 149 | 32 | 209 | 969 | 71.30% |
| 98 | Madarsa Unrecognized | 545 | - | 170 | - | 150 | 225 | 41.28% |
| Grand Total | | 2,12,57,854 | 22 | 5,16,188 | 31,799 | 12,25,177 | 1,94,84,681 | 91.66% |

Scanned with OKEN Scanner